**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdhepune@gmail.com  Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. एनएसपी पोर्टल-२०२१-२२/(६८६१/२१)/शिष्यवृत्ती/3390 दिनांक : १३.०९.२०२१

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - NSP पोर्टलवरील शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना बँकेची माहिती अद्ययावत करण्याबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं- २०२१-२२/केंद्रपुरस्कृत अल्प/ शिष्यवृत्ती /९९८५ दि. ७.९.२०२१.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १. केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना ३. अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते.

केंद्रशासनाच्या सूचनेद्वारे सन २०२०-२१ मध्ये ज्या विद्यार्थ्यांना बँक वैधतेमुळे केंद्रशासनाच्या शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा झालेली नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांना एन.एस.पी. पोर्टलद्वारे SMS पाठविण्यात आलेले आहेत. तसेच संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगीन मध्ये बँकेचा तपशील अद्ययावत करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तथापि ही शेवटची संधी देण्यात आलेली असून यापुढे विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही. याबाबत महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी सर्व विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रति -
१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.